**महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे अखत्यारीत असलेले अल्प मुदतीचे व्यावसायाभिमुख पदविका अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुरु करण्यास शासन मान्यता देणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक मान्यता-२०२१/(१२८/२१)/तांशि-५**

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २४ नोव्हेंबर, २०२१

वाचा : १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक मान्यता-२०२१/(प्र.क्र.११/१२१/ तांशि-५, दिनांक : ०३.०५.२०२१.

२) महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार, असाधारण क्रमांक १९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.२, दि.०२.०९.२०२१.

३) महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, अधिसूचना क्र.मरातंशिम/का-५३/अधिसूचना/२०२१-२२/ ५७९४, दि.०७.०९.२०२१.

४) महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचे जा.क्र.मरातंशिमं/का-५०/अल्पमुदतीचे अभ्यासक्रम/ २०२१ / ६५९१, दि.०८.१०.२०२१.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे अखत्यारीत असलेले अल्प मुदतीचे व्यावसायाभिमुख पदविका अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुरु करणेबाबतची कार्यपध्दती उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे दिनांक ०३/०५/२०२१ रोजीचे शासन निर्णयान्वये विहीत केलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने दिनांक २५/०५/२०२१ व दिनांक ०७/०९/२०२१ रोजी अधिसूचना प्रसिध्द करुन, इच्छुक संस्थांकडून ऑनलाईन प्रणालीव्दारे अर्ज मागविले होते.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडे सदर अधिसूचनेनुसार प्राप्त झालेले अर्ज व अर्जासोबतच्या मुळ कागदपत्रांची कागदपत्र पडताळणी समितीमार्फत तपासणी तसेच पात्र संस्थेतील पायाभूत सुविधांची भौतिक पडताळणी तज्ञ समितीद्वारे करण्यात आली. तद्‌नंतर राज्यस्तरीय समितीने विभागीय स्तरीय समितीच्या अहवालांची पडताळणी करुन त्याअनुषंगाने नवीन संस्था सुरु करणे, संलग्नीत शैक्षणिक संस्थेत नवीन अभ्यासक्रम राबविणे, अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेमध्ये वाढ/ घट करणे, अभ्यासक्रम बंद करणे, संस्थेच्या नावात बदल करणे, संस्थेच्या पत्त्यात बदल करणे व संस्था बंद करणेबाबतचा प्रस्ताव मंडळामार्फत शासनास सादर केला आहे. त्यास अनुसरुन शासन मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे अखत्यारीत असलेले अल्पमुदतीचे व्यावसायाभिमुख पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांना सोबतच्या Annexure - A, B, C, D, E व F मध्ये नमुद केल्यानुसार नवीन संस्था सुरु करणे, संलग्नीत शैक्षणिक संस्थेत नवीन अभ्यासक्रम

राबविणे, अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेमध्ये वाढ/घट करणे, अभ्यासक्रम बंद करणे, संस्थेच्या नावात बदल करणे, संस्थेच्या पत्त्यात बदल करणे व संस्था बंद करण्यास खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार त्याखालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रपत्र | तपशिल | एकूण संस्था |
|---|---|---|---|
| १. | Annexure-A | List of Short Term Courses With It's Intake In New & Existing Institutes Approved By Government of Maharashtra From Academic Year २०२१-२२. | १२६ |
| २. | Annexure-B | List of Short Term Courses For Variation In Intake of Courses In Existing Institutes Approved By Government of Maharashtra From Academic Year २०२१-२२. | १६ |
| ३. | Annexure-C | List of Short Term Courses For Closure of Courses In Existing Institutes Approved By Government of Maharashtra From Academic Year २०२१-२२. | ५ |
| ४. | Annexure-D | List of Change in Name of Existing Institutes Conducting Short Term Diploma Courses Approved by Government of Maharashtra from A.Y २०२१-२२. | ३ |
| ५. | Annexure-E | List of Change in Place of Existing Institutes Conducting Short Term Diploma Courses Approved by Government of Maharashtra from A.Y २०२१-२२. | २ |
| ६. | Annexure-F | List of Closure of Existing Institutes Conducting Short Term Diploma Courses Approved by Government of Maharashtra from A.Y २०२१-२२. | ३ |
| | | **एकूण** | **१५५** |

१) मंडळाच्या अखत्यारीतील शासन मान्य अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांना देण्यात येणारी मंजूरी ही शासनाच्या दि. २१.५.१९८३ च्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने कायम विना अनुदान तत्वावर असून सदर अभ्यासक्रमांना शासनाचे कोणत्याही प्रकारचे अनुदान देय असणार नाही.

२) सदर अभ्यासक्रमांचा कालावधी, प्रवेशक्षमता, सत्रपध्दत इ. बाबी शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टांमध्ये नमूद केल्याप्रमाणे राहतील.

३) शासकीय संस्थांच्या बाबतीत खालील अटींच्या अधिन राहून मंजुरी देण्यात येत आहे.

अ) मंजुरी देण्यात येणाऱ्या अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांसाठी अतिरिक्त शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नव्याने नियुक्ती करणे आवश्यक असल्यास, त्याकरीता सदर संस्थांना

सद्यस्थितीत/भविष्यात पदनिर्मितीची मागणी शासनाकडे करता येणार नाही. तसेच याबाबतचे प्रस्ताव शासनाकडून मान्य केले जाणार नाहीत.

ब) सदर अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांसाठी नियुक्त शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतन/ वेतनेतर बाबींसाठी शासनाकडून अनुदान दिले जाणार नाही.

क) नवीन मंजुरी देण्यात येणाऱ्या अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांकरीता अतिरिक्त वर्गखोल्या व प्रयोगशाळा उभारण्यासाठी तसेच अभ्यासक्रमांसाठीच्या इतर खर्चाकरीता शासनाकडून कोणतेही अनुदान दिले जाणार नाही.

४) संस्थेने अभ्यासक्रम चालविण्यास पूर्णवेळ शिक्षकवृंद व इतर तांत्रिक कर्मचारी नेमावे व नियमाप्रमाणे वेतन व भत्ते कर्मचाऱ्यांना देण्यात यावेत. तसेच शिक्षकवृंद व इतर कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्ते इत्यादीबाबत तसेच विद्यार्थ्यांकडून शासनाकडे तक्रारी आल्यास संस्थेवर कडक कारवाई करण्यात येईल.

५) सदर अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमासाठी संस्थेने महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची संलग्नता घेणे आवश्यक आहे. तसेच या शासन निर्णयाद्वारे मंजूरी प्राप्त अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने राबविण्याचे ठरविल्यास सदर अभ्यासक्रमांना अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेची मान्यता घेणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

६) व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शासनाचे फी प्रतिपूर्तीचे जरी धोरण असले तरी, त्यामध्ये कोणत्याही अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांना फी प्रतिपूर्ती योजना लागू नाही. त्यामुळे वरील अभ्यासक्रमाकरीता फी प्रतिपूर्ती योजना कोणत्याही प्रवर्गातील विद्यार्थ्यांना लागू राहणार नाही. आर्थिकदृष्टया मागास असलेल्या विद्यार्थ्यांना देखील फी प्रतिपूर्ती/सवलत योजना लागू होणार नाही.

७) शासनाने विहित केलेल्या तसेच, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे विहित नमुन्यातील रुपये पाचशेच्या स्टँम्पपेपरवर हमीपत्र मंडळास सादर करणे संस्थांना बंधनकारक राहील.

८) संबंधित संस्थेने संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडे आवश्यक ती मुदतठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

९) सदर संस्थेने नियमित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नियुक्ती, यंत्रसामुग्री व अद्यावत प्रयोगशाळा आणि मानकांप्रमाणे ग्रंथालय सुविधा विद्यार्थ्यांना देत असल्याबाबत शपथपत्र संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांनी घ्यावे. याबाबींची पूर्तता करुन घेण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उप सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय यांची राहील.

१०) संस्थेतील ग्रंथालयास आवश्यक ती पुस्तके, नियतकालिके महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांच्या मानकानुसार खरेदी करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांना वाचनालयाचा पुरेपूर उपयोग होण्याच्या दृष्टीने ग्रंथालयात विद्यार्थ्यांना अभ्यासिकेची सोय करणे आवश्यक आहे.

११) सदर संस्था संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ यांच्या नियंत्रणाखाली राहील व संबंधित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, बांद्रा, मुंबई यांचेकडून घेतल्या जातील.

१२) सदर अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांचे प्रवेश गुणवत्ता, आरक्षण इत्यादी बाबतच्या शासकीय धोरणानुसार मंडळाच्या नियंत्रणाखाली करण्यात यावे.

१३) सदर शासन निर्णयांन्वये मान्यता मिळालेला अभ्यासक्रम संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून सुरू करणे आवश्यक राहील. संस्थेने सदर अभ्यासक्रम त्याप्रमाणे सुरु न केल्यास संस्थेला सदर अभ्यासक्रमाकरीता देण्यात आलेली मान्यता आपोआप रद्द होईल.

१४) शासन मान्यता व महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची संलग्नता मिळाल्याशिवाय कोणत्याही संस्थेने विद्यार्थ्यांचे प्रवेश करु नयेत. मान्यता / संलग्नता मिळाल्याखेरीज विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यास, त्यास संपूर्णत: संस्था जबाबदार राहील.

१५) शासनाने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संस्थेने आकारल्यास संस्थेवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

१६) रॅगिंग संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

१७) याशिवाय संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती संस्थेस लागू राहतील.

१८) शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी उपरोक्त अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे किंवा नवीन अटी व शर्ती अंतर्भूत करण्याचे अधिकार शासनास राहतील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१११२४१२२१४६०१०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( मनाली सामंत )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, वांद्रे (पूर्व), मुंबई,
३. सर्व उप सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालये (महाराष्ट्र राजय तंत्र शिक्षण मंडळामार्फत),
४. संबंधित संस्था (महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळामार्फत),
५. निवड नस्ती/तांशि-५

| Sr.No | Institute Code | Trust Name & Address | Institute Name & Address | Region | Name of Course(s) | Intake | Duration of Course in years | Yearly/ Semester pattern | Course Type |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 115 | NEW | Swami Samarth & Om Gagangiri Foundation Khambe,Sangamner At-Khambe , Sangamner Taluka-Sangamner District -Ahmednagar State-Maharashtra | Samarth Institute of Paramedical Science Sangamner At-Sangamner , Akole Baypass Road Taluka-Sangamner District-Ahmednagar State-Maharashtra | Nashik | Advanced Diploma in Medical Laboratory Technology. (LX) | 60 | 1.5 | Semester | Full Time |
| 116 | NEW | Sharda Shaikshanik And Samajik Sanstha Sharda Shaikshanik And Samajik Sanstha Gondur Airport Road, Near District Stadium, Valwadi, Dhule | Vidyadhan DMLT College Valwadi Dhule Sharda Shaikshanik And Samajik Sanstha, Vidyadhan College, Valwadi, Dhule Near Stadium, Airport Road, Dhule | Nashik | Advanced Diploma in Medical Laboratory Technology. (LX) | 60 | 1.5 | Semester | Full Time |
| 117 | 1991 | Eklavya Sevabhavi Sanstha's Manchi Hill,Ashvi Bk Tal-Sangamner Dist-Ahmednagar 413714 | Ashvin College of Pharmacy Manchi Hill , Sangamner At Manchi Hill Post Ashvi Bk Tal Sangamner | Nashik | Advanced Diploma in Medical Laboratory Technology. (LX) | 60 | 1.5 | Semester | Full Time |
| | | | | | Advanced Diploma in X-ray Radiography (RX) | 60 | 1.5 | Semester | Full Time |
| 118 | 1171 | Matoshri Education Society Darade Complex, Manmad Road, Yeola, Tal: Yeola, Dist: Nashik | Matoshri Institute of Technology Sur No.101/3A,101/2/1,Dhanore, Tal: Yeola, Dist: Nashik,423401 | Nashik | Diploma in Animation & Graphics (DA) | 60 | 2 | Semester | Full Time |
| | | | | | Diploma in Fashion and Textile Designing (FN) | 60 | 2 | Yearly | Full Time |
| | | | | | Diploma in Interior Designing and Decoration (ID) | 60 | 2 | Yearly | Full Time |
| 119 | 1776 | Kalyani Charitable Trust Kalyani Charitable Trust Ravi Communications, J.J. Hospital Compound, Byculla, Mumbai 400008 Corporate Office - 'Parag' 46, Ashwin Sector, Opp. Hotel Sai Palace, Mumbai-Agra Road, Nashik. 422 009 | Kalyani Charitable Trust's R.G.Sapkal Institute of Pharmacy , Nashik Sapkal Knowledge Hub,Kalyani Hill,Anjaneri,Wadoli,Tal-Trimbakeshwar,Dist-Nashik,Pin-422213 | Nashik | Advanced Diploma in Medical Laboratory Technology. (LX). | 60 | 1.5 | Semester | Full Time |
| 120 | 1472 | Shiva Trust, Aurangabad 3Rd Floor, Soniya Chamber, Near Seven Hill Over Bridge, Jalna Road, Aurangabad | Ajitdada Pawar College of Polytechnic A/P Wadala Mahadev, Shrirampur-Newasa Road, Tal. Shrirampur Dist. Ahmedanagar(Ms),Pin - 413 739. | Nashik | Advanced Diploma in Industrial Safety and Security Management (FF) | 40 | 1 | Yearly | Full Time |
| | | | | | Advanced Diploma in Medical Laboratory Technology. (LX) | 60 | 1.5 | Semester | Full Time |
| | | | | | Advanced Diploma in X-ray Radiography (RX) | 60 | 1.5 | Semester | Full Time |
| 121 | 583 | Jagdamba Education Society Darade Complex, Manmad Road, Yeola, Tal: Yeola, Dist: Nashik | S.N.D.College of Polytechnic Babhulgaon, Tal: Yeola, Dist: Nashik | Nashik | Diploma in Fire Service Engineering (FR) | 40 | 2 | Yearly | Full Time |
| 122 | 1924 | Prasad Gramin Shikshan Sanstha At Ganegaon Po Guha Tal Rahuri Dist Ahmednagar ( Maharashtra) 413706 | Mrs. Saraswati Wani College of D.Pharmacy , Ganegaon At Ganegaon Po Guha Tal Rahuri Dist Ahmednagar ( Maharashtra) 413706 | Nashik | Advanced Diploma in Medical Laboratory Technology. (LX) | 60 | 1.5 | Semester | Full Time |
| 123 | 1164 | Tuljabhavani Seva Pratishthan At Post-Wangdari, Taluka:Shrigonda, Dist:Ahmednagar | Soniya Gandhi Polytechnic At- Balajinagar, Post-Shrigonda, Taluka:Shrigonda, Dist:Ahmednagar | Nashik | Advanced Diploma in Industrial Safety (IT) | 40 | 1 | Yearly | Full Time |